
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 4 | JANUARY - 2025

# विनोदकार आचार्य अत्रे

डॉ. आनंदा गांगुर्डे
मराठी विभाग प्रमुख, विद्या प्रतिष्ठान, बारामती.




आचार्य प्र.के. अत्रे हे मराठी साहित्यातील एक अष्टपैलू लेखक .त्यांनी कथा ,कादंबरी ,कविता, नाटक ,आत्मकथन, आत्मचरित्र ,चित्रपट कथा, विनोद आदी साहित्यप्रकार लीलया हाताळले .मी कसा झालो ? हे त्यांचे वांङमयीन आत्मकथन आहे .ते मराठी साहित्यात लोकप्रिय आहे.त्यात त्यांनी मी कवी, विडंबनकार ,लेखक, शिक्षक ,वक्ता ,पत्रकार, चित्रपट ,कथाकार, नाटककार ,कसा झालो याचे फार सुरेख वर्णन केले आहे .मुळात हे आत्मकथन आहे .आत्मकथन हे ऐन उमेदीच्या वयात लिहिले जाते .तर आत्मचरित्र हे शक्यतो उतार वयात लिहिले जाते .आत्मचरित्र या संकल्पनेविषयी आपल्या आत्मचरित्र मीमांसा या ग्रंथात डॉ. आनंद यादव म्हणतात , " आत्मचरित्र याचा वांङमयीन क्षेत्रातील अर्थ मी माणूस या नात्याने माझ्या जीवनात जी काही आजवर वाटचाल केली .त्या वाटचालीत माझी स्थिती गती म्हणजे सुखदुःखे आशा आकांक्षा विकास विस्तार भाव सत्ये कृत कर्म आणि या सर्वांतील यशापयश धडपड यांचा मी केंद्रस्थानी धरून काढलेला आलेख किंवा नकाशा असा सर्वसाधारण होतो .म्हणजेच आत्मचरित्रात मी हा केंद्रस्थानी असतो. आत्मचरित्र या संकल्पनेमध्ये त्याच्या स्व बरोबरच त्याच्या चारित्र्यालाही महत्त्व असते. त्यामुळे भारतीय साहित्यात आत्मचरित्र ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरली जाते." १ याप्रमाणेच आचार्य अत्रे यांनी त्यांच्या मी कसा झालो व क-हेचे पाणी या आत्मचरित्रांमध्ये त्यांची लेखक म्हणून कशी जडणघडण झाली याचे अतिशय सुंदर चित्रण केले आहे.

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे म्हणजे मराठी साहित्यातील बहुप्रसवा प्रतिभावंत .एक खट्याळ व्यक्तिमत्व ,उमदा माणूस आणि अहोरात्र अव्यहात वाहणारा एक चैतन्याचा प्रवाह. या प्रवाहात मराठी रसिक यथेच्छ डुंबत राहिले . हसणे व हसवणे यासाठी त्यांनी जीवाचे रान केले विनोद हे त्यांच्या जीवनाचे आत्मतत्त्व होते .हास्य आणि विनोद हे मानवी जीवनातले एक मोठे रहस्य आहे याची त्यांना खात्री होती म्हणून विनोद निर्मिती करून अत्र्यांनी चैतन्याचा स्रोत निर्माण केला .दुःख विसरून माणसांनी नेहमी हसत रहावे असे त्यांना वाटे. हास्य हे नेहमी आरोग्यदायी असते. म्हणून देवादिकांनी समुद्रमंथन करून चौदा रत्ने बाहेर काढली .त्यामध्ये त्यांना विनोदाचे रत्न कसे काय सापडले नाही .याचे आश्चर्य त्यांना वाटते .पण मात्र जे देवादिकांना सापडले नाही ते आचार्य अत्र्यांनी गवसून काढले व मराठी रसिकांना सतत हसवत ठेवले .विनोद निर्मितीसाठी माणूस खेळकर

व खोडकर असावा लागतो .गंभीर प्रवृत्तीचा माणूस शक्यतो विनोदाच्या फंदात पडत नाही.हसण्या हसवण्यासाठी विनोद बुद्धी लागते ती अत्र्यांकडे भरपूर होती .म्हणून प्रत्येक प्रसंगाकडे ते विनोदी नजरेने बघू शकले .आचार्य अत्र्यांचा मूळ स्वभावच विनोदाला पूरक होता. सासवड सारख्या ग्रामीण वातावरणात बालपण गेल्यामुळे खेड्यातील माणसांचा विसंगती पूर्ण स्वभाव टिपण्यात त्यांना यश आले. चावटपणा , वात्रटपणा टिंगल व टवाळी मौज व गंमत गुद्दे व गुदगुल्या आणि विडंबन असा त्यांचा स्वभाव असल्यामुळे त्यांना विनोदासाठी फार कसरत करावी लागली नाही. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि राम गणेश गडकरी हे त्यांचे विनोद वाङ्मयातील तीर्थस्थाने .अत्र्यांच्या विनोदावर कोल्हटकर आणि गडकरी यांचा प्रभाव आहे " कोल्हटकर यांच्या " सुदामाचे पोहे "यात मला उदात्त व विशुद्ध विनोदाचे दर्शन झाले .आमच्या गावाजवळच्या पुरंदर किल्ल्याच्या शिखरावर केदारेश्वराचे एक देऊळ आहे .या देवळावरून समुद्र दिसतो असे म्हणतात. तो अनुभव मला या विनोदी पुस्तकाने दिला .विनोदाचा अफाट आणि अथांग सागर मला या पुस्तकाने दाखवला. त्यामुळे माझ्या विनोदाच्या अपेक्षांचे क्षितिज विस्तीर्ण झाले. आणि माझ्या विनोदी लेखनाच्या महत्त्वकांक्षेचा पल्ला अधिक व्यापक झाला .या एका पुस्तकांने माझ्या जीवनात फार मोठी क्रांती घडवून आणली. " २ अशी स्पष्ट कबुली अत्र्यांनी त्यांच्या ' मी कसा झालो ? ' या वांङमयीन आत्मकथनातून दिली आहे. याचा अर्थ अत्र्यांनी कोल्हटकरांच्या ' सुदाम्याचे पोहे ' या विनोदी लेखसंग्रहाला आपल्या विनोदी वाङ्मयाचे प्रेरणास्रोत मानले आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि राम गणेश गडकरी यांच्या विनोदाचा प्रभाव त्यांच्यावर होता .ते या संदर्भात लिहितात , " गडकऱ्यांच्या मुखातून मला विनोदी लेखनाची सर्व विद्या शिकायला मिळाली. विनोदाचे मंत्र आणि तंत्र ही काय असतात हे त्यांनी मला प्रथम सांगितले. विनोदाचे सर्व प्रकार सर्व पद्धती निरगळ्या प्रकारची साम्ये आणि फरक त्या फरकामधील सूक्ष्म छटा यांचे ज्ञान मला त्यांनी करून दिले " ३ यावरून गडकरी हे अत्र्यांचे विनोद वाङ्मयातील गुरु ठरतात. विनोदी कविता , विनोदी लेखन , विनोदी वर्णन ,नाटक, संभाषण विनोदाचे तत्वज्ञान या सर्वच विनोद क्षेत्रात अत्र्यांचा विनोद पसरलेला आहे .' झेंडूची फुले ', ' विनोद गाथा ' , ' हास्य कथा ' , ' अत्रे उवाच ' 'हशा आणि टाळ्या ' , ' मुद्दे आणि गुद्दे ' इ. साहित्यातून आचार्य अत्र्यांनी समाजातील विसंगती, मानवी स्वभाव यांच्या आधारे मराठी रसिकांना पोट धरून हसायला शिकविले .

अत्र्यांची विनोदी नाटके ही तर स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे .' साष्टांग नमस्कार ', ' भ्रमाचा भोपळा ' , ' लग्नाची बेडी ', ' मोरूची मावशी ', ' कवडी चुंबक ' , ' ब्रह्मचारी ' आदि नाटकातून त्यांनी शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ व प्रसंगनिष्ठ विनोदाची पकड करून मराठी श्रोत्यांना मनमुराद हसवले. ' साष्टांग नमस्कार ' या नाटकात नमस्कार या सहज प्रवृत्तीचे अतिरेकी विडंबन करून विनोदाची निर्मिती होते. ' लग्नाची बेडी ' सारखे सदाबहार नाटक हे तर प्रसंगनिष्ठ विनोदावर अगदी धमाल उडवून देते. ' झेंडूची फुले ' या विडंबनपर काव्यसंग्रहात अत्र्यांच्या विनोदाचे सर्व गुणविशेष प्रकट झाले आहेत . विडंबन या एका वेगळ्याच विनोद प्रकाराला अत्र्यांनी मराठी साहित्य विश्वात प्रतिष्ठित केले .साहजिकच विडंबन काव्याचे जनकत्व आपोआपच त्यांच्याकडे चालत आले .विडंबन हा अत्रे यांच्या विनोदाचा स्थायी स्वभाव आहे. आपल्या स्थायी स्वभावाची स्पष्ट जाणीव अत्रे यांना झेंडूच्या फुलांच्या अफाट लोकप्रियतेने करून दिली." खरे म्हणजे मला विडंबन काव्य न लिहिता शुद्ध भावकविता लिहायची होती. बालपणी बालकवी व्हायचे होते , गोविंदाग्रज व्हायचे होते, त्यासाठी माझी सगळी खटपट चालू होती .हे सगळे राहिले बाजूला आणि मी देवाच्या आळंदीला जाण्याऐवजी चोराच्या आळंदीला पोहोचलो " ४ . अशी स्पष्ट कबुली त्यांनी त्यांच्या " मी कसा झालो " या पुस्तकात दिली आहे. याचा अर्थ अत्रे अपघाताने विनोदाकडे वळले .पण त्यांनी या प्रांताचे सोने केले .अखिल मराठी वांग्मयात त्यांनी विनोदाला मानाचे स्थान प्राप्त करून दिले .शाब्दिक कोटी हा अत्र्यांचा हुकमी एक्का होता .शाब्दिक कोट्यांवरून त्यांनी राजकारणातील व समाजकारणातील व भल्या भल्यांची भंबेरी उडवून दिली.नामदार स.का. पाटील यांच्यावर कोटी करून त्यांनी त्याचा नासका पाटील करून टाकला .तर यशवंतराव चव्हाण यांच्या आडनावातील च गाळून

त्यांना पायातील वहान करून टाकली. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात अत्र्यांच्या झंझावाती भाषणाने बाळासाहेब खेरांपासून ते पंडित जवाहरलाल नेहरू पर्यंत सर्वांची दाणादाण उडवून टाकली . त्यांच्या विनोदी वाङमयाने प्रति पक्षाला घायाळ करून टाकले. समर्थ रामदासांची " टवाळा आवडे विनोद " ही म्हण आचार्य अत्रे यांनी अक्षरशः खोटी ठरवली. कधी शस्त्र तर कधी शास्त्र म्हणून कधी औषध म्हणून त्यांनी विनोदाचा सफाईदारपणे वापर केला. केवळ हसवणे हे अत्रे यांच्या विनोदामागील प्रयोजन कधीच नव्हते. हसवता हसवता अंतर्मुख करायला प्रवृत्त करणारा विनोद त्यांनी निर्माण केला. समाजातील विवाह परंपरांवर त्यांनी विनोदाच्या माध्यमातून तिरकस भाष्य केले .म्हणजे समाजप्रबोधनासाठी केवळ गंभीर प्रश्न निर्माण करण्यापेक्षा मनमोकळ्या आणि खेळकरपणे त्यांच्याकडे पहावे आणि आपल्या विवाह पद्धतीची दोषांवर हसत हसत टीका करून समाजाच्या डोळ्यात अंजन घालावे यासाठी त्यांनी " लग्नाची बेडी "हे नाटक लिहिले .या नाटकातील विनोद समाजातील लग्न करण्याच्या पद्धतीतील दोषाच्या मार्मिक विडंबनावर आधारलेला आहे. हसत हसत प्रेक्षकांना अंतर्मुख करून समाजातील विवाह समस्येवर अस्वस्थ करण्याचे सामर्थ्य या विनोदात आहे .उच्च दर्जाच्या विनोदाची हीच खरी कसोटी मानली जाते. तो नुसता हसवीत नाही तर हसवता हसवता माणसाला अंतर्मुख करतो आणि त्याच्या विचारांना चालना देतो .गांभीर्य आणि विनोद यांची समतोल सांगड घालण्याचे काम आचार्य अत्र्यांनी या नाटकात केले आहे .अशा प्रकारे अत्रे यांच्या विनोदाची जातकुळी वेगळी आहे .त्यांचा विनोद प्रासादिक असून तो बोचकारे काढून रक्त बंबाळ करणारा नाही , तर सामाजिक भान व विचार करायला प्रवृत्त करणार आहे . ' भ्रमाचा भोपळा ' या कौटुंबिक नाटकातील विनोद यावर आधारलेला आहे .भांडखोर आई बापांच्या तीन त-हेवाईक मुली यात आहेत .या प्रत्येकीचा स्वभाव अतिरेकी आहे .स्वभाव विरोधामुळे नाटकात हास्याची निर्मिती होते. एकाच कुटुंबातील माणसाविषयी परस्पर भ्रम निर्माण करण्यात अत्रे कमालीचे यशस्वी झालेले आहेत . स्वभावनिष्ठ विनोदाचा एक वेगळा आविष्कार यात आहे. अखिल मराठी साहित्य विश्वात विनोदाचा बादशहा म्हणून अत्र्यांकडे बघितले जाते. याचे कारण ज्याप्रमाणे ललित साहित्यात लोकशाही समाजात आणि राजकारणात विनोदाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी सातत्याने लेखन भाषणाच्या रूपाने पाठबळ निर्माण करण्याचाही प्रयत्न केला .अर्थात त्यांच्या विनोदाविषयी मान्यवर विचारवंतांमध्ये गैरसमजही पुष्कळ झाले .मोठ मोठ्या लेखकांना अत्र्यांचा विनोद पचवला गेला नाही .गेल्या 30 वर्षापासून मी विनोदाचे दुकान उघडून हा धंदा चालविला आहे तरी अजून कित्येकांचा गैरसमज दूर झाला नाही .अशी स्वतः अत्रे यांनी स्पष्ट केले आहे. याचे कारण अत्र्यांचा खेळकर व खोडकर स्वभाव .कोणत्याही गंभीर प्रश्नांना ते विनोदाची झालर चढवतात .त्यामुळे अत्रे यांन फारसे गांभीर्याने घेत नाहीत .ते सतत हसल्यावरी नेतात .असा आरोप त्यांच्यावर केला जातो. उच्च दर्जाचा व अनेक विविध सूक्ष्म रंग रूपाचा विनोद अत्र्यांच्या कक्षेत फार कमी प्रमाणात आला. असेही म्हटले जाते .परंतु असे असले तरी पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या महान लेखकाने अत्रेय विनोदाची मुक्त कंठाने प्रशंसा केली आहे. ते म्हणतात " या माणसाने गेली अनेक वर्ष विनोदाचा हा वन्ही कितीतरी प्रकारांनी चेतवित ठेवला. मराठी माणसांना तासनतास एकत्र बसून आपल्या विनोदी वाणीने आणि लेखणीने सतत ताजेतवाने ठेवले. मराठी समाजजीवनावर अत्र्यांचे हे मोठे उपकार आहेत. एका श्रेष्ठ विनोदकारांनी अत्र्यांच्या विनोदाला दिलेले हे प्रशस्तीपत्रक त्यांची गुणवत्ता वाढवणारे आहे. कौटुंबिक सुखदुःखावर विनोदाची फुंकर मारून आचार्य अत्रे यांनी मराठी जनांना सतत हसवत ठेवले. हे आचार्य अत्रे यांचे महाराष्ट्रावर फार मोठे उपकार आहेत .

### संदर्भ सूचीः

१. आनंद यादव , 'आत्मचरित्र मीमांसा ' , मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथम आवृत्ती , १९९८ ,पृष्ठ-४७
२.आचार्य प्र. के.अत्रे , ' मी कसा झालो ' परचुरे प्रकाशन मंदिर , मुंबई, आवृत्ती तेरावी २००७ पृष्ठ-७६

३. तत्रैव ,पृष्ठ - ७७
४.तत्रैव , पृष्ठ -९६